# परिपत्रक

विद्यापीठ अनुदान आयोगाची दि. १८/०७/२०१८ रोजीची अधिसूचना व शासन निर्णय क्र. एमआयएससी -२०१८/सीआर.५६/१८/युएनआय-१ दि. ०८ मार्च, २०१९ व १० मे २०१९ नुसार Annual self Appraisal Report (ASAR) नमुने (Proforma) तयार करण्यात आले असून त्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिलेली आहे.

सदरचा फॉर्म भरण्यासाठी व तो आश्वासित प्रगती योजना Career Advancement Scheme (CAS) अंतर्गत पदोन्नती चा लाभ घेण्यासाठी खालील मार्गदर्शक नियमावली तयार करण्यात आली आहे. त्याचे काटेकोर पालन करण्यात यावे.

i) CAS आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेण्यासाठी दोन समित्या (Screening-cum-evaluation and Selection committee) असतील.

a. AL-11, AL-12 यासाठी शासन निर्णय ८ मार्च २०१९ मधील मुद्दा क्र. 6.1(VIII) प्रमाणे Screening-cum-evaluation committee गठीत करण्यात येईल.

b. AL-13 A, AL-14, AL 15 या पदावर पदोन्नती करण्यासाठी शासन निर्णय दि. ०८ मार्च २०१९ मधील मुद्दा क्रं. ६.१ प्रमाणे Selection Committee गठीत करण्यात येईल.

ii) Screening-Cum-Evaluation Committee ने खालील बाबींचे मूल्यांकन करावे.

a. सहाय्यक प्राध्यापकांचे Appendix II मधील Table - 1

b. ग्रंथपाल Appendix II मधील Table - 4

c. शारीरिक शिक्षण संचालकांचे Appendix II मधील Table - 5

iii) CAS च्या अंतर्गत पदोन्नती करताना तीन टप्प्यांवर अंमलबजावणी करावी.

a) विद्यापीठ/ महाविद्यालयास ASAR-Appendix-II मधील Table 1 ते 5 शैक्षणिक वर्षाच्या शेवटी योग्य त्या कागदपत्रासहित (पुरावे) HOD किंवा Teacher-in-charge यांचे मार्फत सादर करावे. ASAR ची छाननी HOD/Teacher-in-charge यांच्या मार्फत करावी.

b) शिक्षकांनी पदोन्नतीसाठी विहित कालावधीची सेवा पूर्ण झाल्यानंतर अर्ज प्राचार्यामार्फत विद्यापीठास सादर करावा. तसेच शासन निर्णय दि.०८/०७/२०१९ नुसार त्याची अंमलबजावणी केली जाईल.

c) CAS द्वारे पदोन्नतीची मंजूरी शासन निर्णय दि. ०८/०३/२०१९ मुद्दा क्र. ७.४ नुसार केली जाईल.

iv) मूल्यमापन निकष व पध्दती

a) सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक व वरिष्ठ प्राध्यापकांनी CAS प्रमोशन चा लाभ घेण्यासाठी Appendix II मधील Table-1 व Table-2 च्या गरजेनुसार भरुन विद्यापीठ/महाविद्यालयास सादर करावा.

b) महाविद्यालयीन ग्रंथपाल व विद्यापीठातील सहाय्यक ग्रंथपाल/ उपग्रंथपाल यांनी CAS पदोन्नतीचा लाभ घेण्यासाठी Appendix II मधील Table 4 भरुन तो विद्यापीठ/महाविद्यालयास सादर करावा.

c) महाविद्यालयीन व विद्यापीठातील शारीरिक शिक्षण संचालकांनी CAS पदोन्नतीचा लाभ घेण्यासाठी Appendix II मधील Table-5 भरुन तो विद्यापीठ/महाविद्यालयास सादर करावा.

v) ७ व्या वेतन आयोगाच्या सूचनेनुसार CAS पदोन्नतीचा लाभ शासन निर्णय दि.०८/०३/२०१९ नुसार लागू असेल. तथापि, जे शिक्षक या पूर्वी पात्र असतील त्यांना किंवा लगतच्या काळात पात्र होणार असतील ते ६ वा वेतन आयोग दि. ३० जून २०१० च्या ४ थ्या दुरुस्तीनुसार दि.०८/०३/२०२२ पर्यंत जुन्या API नुसार CAS ला सामोरे जातील. त्यासाठी त्यांनी API शासन निर्णय दि.०८/०३/२०१९ मधील Appendix III मधील Table-A,B,C,D,E च्या गरजेनुसार वापर करावा.

अ) जे शिक्षक CAS साठी अटी पूर्ण करून पात्र होत असतील त्या तारखेच्या तीन महिन्यापूर्वी महाविद्यालय/विद्यापीठ लिखित अर्ज करावा. विद्यापीठ प्रशासन शिक्षकांचे अर्ज दाखल झाल्यानंतर सहा महिन्यात CAS ची प्रक्रिया पूर्ण करेल.

ब) विद्यापीठ प्रशासन CAS शिबिराचे आयोजन परिपत्रकाद्वारे वर्षातून किमान दोन वेळा आयोजित करेल.

क) जे शिक्षक CAS अंतर्गत (AL11, AL12) पदोन्नतीसाठीची किमान पात्रता पूर्ण करत असतील, अशा पात्र शिक्षकांना पात्र तारखेपासून (due date) CAS Promotion देय असेल.

ड) जे शिक्षक CAS अंतर्गत पदोन्नतीसाठीचा किमान पात्रता कालावधी वेळाने पूर्ण करत असतील त्या शिक्षकांना CAS पदोन्नतीचा लाभ नंतरच्या पात्र झालेल्या तारखेपासून देय असेल.

vi) जे शिक्षक प्रथम मूल्याकंनात अपात्र होतील, त्यांचे पुनर्मूल्यांकन फक्त एका वर्षाने होईल व त्यांना CAS पदोन्नती अपात्र झालेल्या तारखेच्या एका वर्षानंतर देय असेल.

अधिकच्या माहितीसाठी शासन निर्णय दि.०८/०३/२०१९ मधील मुद्दा क्र. ६.१, ६.२, ६.३, ७.०, ७.१, ७.२, ७.३, ७.४ वाचन करावे.